श्री ज्ञानेश्वरी

अध्याय तीसरा

दुसऱ्या अध्यायाचे शेवटी महाराज अर्जुनाचे मनातले बोलून दाखवतात . भगवंतांनी जो सांख्य मार्ग व कर्मयोग मार्ग सांगीतला त्यामुळे भगवंतानीच कर्म करु नकोस असे सांगीतले आहे व त्यामुळे आता युध्द करवयाची गरज नाही.असा अर्जुनाचा समज होतो. मग तो जो प्रश्न करतो त्याने तिसऱ्या अध्यायाची सुरवात होते. अशा प्रकारे 'अध्यायात अध्यायो प्रसवे ' याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. यात कर्म योगाचे विविरण सुरु होते म्हणून यास कर्मयोग अध्याय असे म्हंटले आहे. यात देखील महाराजांनी काही श्लोकांवर भाष्य करण्याचे टाळले आहे जसे श्लोक 8,28,33,40 ते 43.

यात 43 श्लोक असून त्यावर 276 ओव्या आहेत.

यातील ओव्या 41,171 फार सुंदर आहेत.

श्रीज्ञानेश्वरी

अध्याय तिसरा

अर्जुन उवाच

ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन ।
तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव ।।1।।

अर्जुन म्हणाला हे जनार्दना ! कर्मापेक्षा साम्य बुद्धिच श्रेष्ठ असे जर तुमचे मत आहे, तर हे केशवा ! मला युद्धाच्या घोर कर्मात कां घालिता ?

मग , आइका अर्जुने म्हणितले , । '' देवा , तुम्ही जे वाक्य बोलिले ।
ते निके म्यां परिसिले । कमळापति ।।1।।
तेथ कर्म आणि कर्ता ।उरेचिना , पाहतां ।
ऐसे मत तुझे श्रीअनंता । निश्चित जरी , ।।2।।
तरी , माते केवी श्रीहरी ! । म्हणसी , ' पार्था संग्रामु करी ' ।
इये लाजसी ना ; महाघोरी । कर्मी सुतां [1] ।।3।। 1घालताना
हां गा , कर्म तूंचि अशेष । निराकरिसी निःशेष , ।
तरी , मजकरवी हे हिंसक । कां करविसी ? ।।4।।
तरी हेचि विचारी हृषीकेशा ! ।तूं मानु [2] देसी कर्मलेशा [3] । 2 प्रमाण मानणे 3 कर्माचा अल्पांश
आणि येसणी [4] हे हिंसा ।करवीतु आहासी ! ।।5।। 4 येवढी

व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे ।
तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम् ।।2।।

दिसण्यात व्यामिश्र म्हणजे दुटप्पी अशा भाषणाने माझ्या बुद्धिला मोह पाडल्यासारखे तुम्ही करीत आहां.तरी ज्याने मी श्रेय म्हणजे कल्याण पावेन,तेवढे एकच निश्चित करून मला सांगा.

देवा ! तुवाचि ऐसे बोलावे , । तरी , आम्ही नेणती काय करावे ? ।
आतां 'संपले म्हण पां ', आघवे । विवेकाचे ।।6।।
हां गा , उपदेश जरी ऐसा ।तरी अपभ्रंशु [5] तो कैसा ? । 5 गोंधळात टाकणारा
आतां पुरला आम्हां धिवसा [6] । आत्मबोधाचा ।।7।। 6 इच्छा
वैद्यु पथ्य वारूनि [7] जाये , । मग जरी आपणचि विष सुये , । 7 सांगुन
तरी रोगिया कैसेनि जिये ? । सांगै माज ।।8।।
जैसे , आंधळे सुइजे आव्हाटा [8] ,।का , माजवण[9] दीजे मर्कटा । 8 आड रस्ता
तैसा , उपदेशु हा गोमटा [10]। वोढवला आम्हा ! ।।9।। 9 मद्य 10 चांगला
मी आधींचि काही नेणे ,।वरी कवळिलो मोहे येणे ।
श्रीकृष्णा ! विवेकु या कारणे।पुसिला तुज ।।10।।

तंव , तुझी एकेक नवाई [1] ।एथ उपदेशामाजी गोवाई [2] ।
तरी , अनुसरलिया [3] , काई ।ऐसे कीजें ? ।।11।।
आम्ही तनुमनुजीवे । तुझिया बोला वोटंगावे [4] ।
आणि तुवांचि ऐसे करावें ? ।तरी ' सरले म्हण ' ।।12।।
आतां ऐसियापरी बोधिसी , । तरी निके आम्हा करिसी ।
एथ ज्ञानाची आस कायसी ? '' । अर्जुन म्हणे ।।13।।
''तरी , ये जाणिवेचे तरी सरले , । परी आणीक एक असे जाहले ।
जे थितें [5] , हे डहुळले [6] । मानस माझें ।।14।।
तेवीचि , श्रीकृष्णा ! हे तुझे । चरित्र [7] , कांही नेणिजें ।
जरी , चित्त पाहसी माझे । येणे मिषे ।।15।।
ना तरी , झकवीतु [8] आहासी मातें । कीं , तत्त्वचि कथिले ध्वनितें [9] ।
हे अवगमिता [10] निरुते [11] । जाणवेना ।।16।।
म्हणौनि , आइके देवा ! । हा भावार्थु आतां न बोलावा , ।
मज विवेकु सांगावा ।मऱ्हाटा [12] जी ।।17।।
मी अत्यंत जड असे , । परी ऐसाही ; निके परियेसे ।
श्रीकृष्णा ! बोलावे तुवा तैसें । एकनिष्ठ ।।18।।
देखै , रोगाते जिणावे । औषध तरी देयावे , ।
परी ते अति रुच्य व्हावे । मधूर जैसे ।।19।।
तैसे सकळार्थभरित । तत्त्व , सांगावे उचित ।
परी बोधे माझे चित्त ।जयापरी ।।20।।
देवा ! तुज ऐसा निजगुरु , । आजि आर्तीधणी [13] कां न करुं ? ।
एथ भीड कवणाची धरू ? ।तूं माय आमुची ।।21।।
हां गा ! कामधेनूचे दुभते । दैवे जाहले जरी आपैतें , ।
तरी , कामनेची कां तेथें , । वानी कीजें ? ।।22।।
जरी चिंतामणी हाता चढे , । तरी वांछेचे कवण सांकडे ?।
कां , आपुलेनि सुरवाडे [14] । इच्छावे ना ? ।।23।।
देखा , अमृतसिंधुते ठाकावे [15] , । मग ताहानाचि [16] जरी फुटावे ।
तरी सायासु [17] कां करावे ।मागील [18] तें ? ।।24।।
तैसा , जन्मांतरी बहुती । उपासिता , श्रीलक्ष्मीपती ।
तूं दैवे आजि हाती । जाहलासी जरी , ।। 25 ।।
तरी आपुलिया सवेशा [18] , ।कां न मागावासि परेशा।
देवा ! सुकाळु हा मानसा ।पाहला असें ।। 26।।
देखै, सकळार्तीचे जियाले ,।आजि पुण्य यशासि आलें ।
हे मनोरथ जहाले ।विजयी माझें ।। 27।।

1 विलक्षणपणा 2 गोंधळ
3 प्रमाणे वागण्यास
4 अवलंबुन रहावे

5 स्थिर 6 गडबडले
7 आचरण

8 फसवणे 9 गूढ
10 विचार करता 11 स्पष्ट

12 सोपा

13 इच्छातृप्ती

14 सुख 15 पोचावे
16 तहानेने तडफडणे
17 श्रम 18 पूर्वीचे
अमृत सागरा जवळ येण्याचे

18 इच्छा

जी ! जी ! परममंगळधामा ! । सकळ देवदेवोत्तमा ! ।
तूं स्वाधीन आजि आम्हा । म्हणौनियां ।। 28।।
जैसे मातेच्या ठायी , । अपत्या अनवसरु [1] नाही । 1 वेळअवेळ
स्तन्यालागूनि [2] , पाही । जियापरी , ।।29।। 2 दूध पिण्याकरिता
तैसे , देवा ! तूतें ।पूसिजतसे आवडे ते ।
आपुलेनि आर्ते , । कृपानिधी ! ।।30।।
तरी पारत्रिकीं [3] हित , । आणि आचरिता तरी उचित , । 3 परलोकात
ते सांगै , एक , निश्चित '' । पार्थु म्हणे ।।31।।

श्रीभगवानुवाच

लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयाऽनघ ।
ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ।।3।।

श्रीभगवान म्हणाले हे निष्पाप अर्जुना ! पूर्वी म्हणजे दुसऱ्या अध्यायात ज्ञानयोगाने सांख्यांची आणि कर्मयोगाने योग्यांची अशी या लोकी दोन प्रकारची निष्ठा आहे असे मी सांगितले.

या बोला श्रीअच्युतु । म्हणतसे विस्मितु ।
'' अर्जुना ! ' हा ध्वनितु ' [4] । अभिप्रावो ।।32।। 4 संक्षेपाने
जे , बुध्दियोगु , सांगता , ।सांख्यमतसंस्था , ।
प्रकटिली स्वभावता । प्रसंगे आम्ही ।।33।।
तो उद्देशु तूं नेणसीचि , । म्हणौनि , क्षोभलासि वायाचि ।
तरी , आतां जाणे , म्यांचि । उक्त [5] दोन्ही ।।34।। 5 बोललेले
अवधारी वीरश्रेष्ठा ! । ये लोकी या दोन्ही निष्ठा ।
मजचिपासूनि प्रगटा ।अनादिसिद्धा ।।35 ।।
एकु ज्ञानयोगु म्हणिजें , । जो सांख्यी अनुष्ठिजें , ।
जेथ वोळखीसवे पाविजें । तद्रुपता ।।36।।
एकु कर्मयोगु जाण , । जेथ साधकजन निपूण ।
होऊनियां , निर्वाण । पावती वेळे ।।37।।
हे मार्गु तरी दोनी , । परी एकवटती निदानी [6] । 6 शेवटी
जैसी , सिध्दसाध्य [7] भोजनी । तृप्ती एक ।।38 ।। 7 करावयाचे व केलेले
कां , पूर्वापर [8] सरितां । भिन्न दिसती पाहतां , । 8 पूर्व व पश्चिम
मग , सिंधुमिळणी , ऐक्यता ।पावती शेखी [9] ।।39।। 9 शेवटी
तैसी , दोनीही मतें , ।सूचिती एका कारणातें ।
परी , उपास्ति [10] ते योग्यते- । आधीन असे ।।40।। 10 आचरण करणे
देखै , उत्प्लवनासरिसां [11] , । पक्षी फळासि झोंबे जैसा । 11 उडाल्याबरोबर
सांगै, नरु कैवी तैसा।पावे वेगा ?।।41।।

तो हळु , हळु , ढाळेढाळे [1] , । केउतेनि [2] एके वेळे ।
तया मार्गाचेनि बळे । निश्चित ठाकी।।42।।
तैसे , देख पां विहंगममतें [3] । अधिष्ठूनि [4] ज्ञानातें ।
सांख्य , सद्य [5] मोक्षाते । आकळिती ।।43।।
येर योगिये , कर्माधारे । विहितेचि [6] निजाचारे [7] ।
पूर्णता अवसरे [8] । पावते होती ।।44।।

1 क्रमाक्रमाने 2 कधीना कधी
3 पक्षाप्रमाणे त्वरित मार्ग असण्याचे मत 4 आश्रय करून 5 तात्काळ
6 योग्य 7 स्वतःचा नियमीत आचार
8 कालांतराने

न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ।
न च संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति ।।4।।

पण कर्मांना प्रारंभ केला नाही म्हणजे पुरुषाला नैष्कर्म्य प्राप्त होते असे नाही; आणि कर्माचा संन्यास केला म्हणजे तेवढ्यानेच सिद्धि मिळते असे नाही.

वाचोनि , कर्मारंभ उचित । न करिता , सिद्धवत [9] ।
कर्महीना [10] निश्चित । होईजेना ।।45।।
की , प्राप्तकर्म सांडिजें , । येतुलेनि नैष्कर्म्य होईजें ,।
हे अर्जुना ! वायां बोलिजे । मूर्खपणे ।।46।।
सांगै , पैलतीरा जावे ।ऐसे व्यसन [11] कां जेथ पावे , ।
तेथ , नावेते त्यजावे । घडे केवी ? ।।47।।
ना तरी , तृप्ति इच्छिजें । तरी कैसेनि पाकु न कीजें ? ।
कीं , सिद्धुहि [12] न सेविजे । केवी ? सांगै ।।48।।
जंव निरार्तता [13] नाही , । तंव व्यापारु [14] असे , पाही ।
मग , संतुष्टीच्या ठायी , । कुंठे [15] सहजें ।।49।।
म्हणौनि , आईके पार्था ! । जयां नैष्कर्म्यपदी आस्था , ।
तया , उचित कर्म , सर्वथा ।त्याज्य नोहे ।। 50।।
आणि आपुलिये चाडे [16] । आपादिले [17] , हे मांडे [18] , ।
की, त्यजिले , कर्म सांडे ,।ऐसे आहें ?।।51 ।।
हे वायांचि [19] सैरा [20] बोलिजें ,। उकलु तरी देखोनि [21] पाहिजें ,।
परी , त्यजिता , कर्म न त्यजे , । निभ्रातं मानी ! ।।52।।

9 सिद्धाप्रमाणे
10 कर्म न करणारा
11 इच्छा
12 तयार असलेला
13 पूर्ण निष्कामत्व 14 कर्म
15 थांबणे
16 आपल्या मना प्रमाणे
17 स्वीकारणे 18 घडते
19 व्यर्थ 20 वाट्टेल तसे
21 निवाडा करून

न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।
कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ।।5।।

कारण कोणी झाला तरी काही ना काही कर्म केल्यावाचून क्षणभर देखील केव्हाहि रहात नाही.
प्रकृतीचे गुण परतंत्र झालेल्या प्रत्येक इसमास नेहमी काही ना काही तरी कर्म करण्यास लावीत असतात.

जंव प्रकृतिचे अधिष्ठान [1] । तंव , सांडी मांडी [2] , हे अज्ञान ।
जे , चेष्टा [3] ते गुणाधीन [4] ।आपैसी [5] असे ।।53।।
देखै, विहित [6] कर्म जेतुले , । ते सळे[7] जरी वोसंडिले ,।
तरी, स्वभाव काय निमाले [8] । इंद्रियांचे ? ।।54।।
सांगै, श्रवणी ऐकावे ठेले ?।की नेत्रीचे तेज गेलें ? ।
हे नासारंध्र बुझाले ? । परिमळु नेघे ?।।55।।
ना तरी, प्राणापानगति ,।की निर्विकल्प जाहली मती ?।
की क्षुधातृषादि आर्ति ।खुंटलिया ? ।।56।।
हे स्वप्नावबोधु [9] ठेले , ।की , चरण चालो विसरले ? ।
हे असो , काय निमाले । जन्ममृत्यु ? ।57।।
हे न ठकेचि जरी कांहीं ? । तरी सांडिले ते कायी ? ।
म्हणौनि , कर्मत्यागु नाही । प्रकृतिमंता ।।58।।
कर्म पराधीनपणे । निपजतसे पकृतिगुणे , ।
येरी , धरी मोकली [10] अंतःकरणें , । वाहिजे वाया [11] ।।59।।
देखै , रथी आरुढिजें , । मग जरी निश्चळा बैसिजे , ।
तरी , चळु होऊनि हिंडीजें । परतंत्रा ।।60।।
कां , उचलिले वायुवशे , । चळे ,शुष्क पत्र जैसे ।
निचेष्ट आकाशे । परिभ्रमे ।।61।।
तैसे , प्रकृतिआधारे , । कर्मेंद्रियविकारे , ।
नैष्कर्म्यही व्यापारे । निरंतर ।।62।।
म्हणौनि , संगू जव प्रकृतीचा , ।तंववरी त्यागु न घडे कर्माचा ।
ऐसियाही , करुं म्हणती , तयांचा । आग्रहोचि उरे ! ।।63।।

1 आश्रय 2 करीन न करीन 3 हालचाल
4 गुणाच्या ताब्यात 5 आपोआप
6 धर्मानुसार 7 हट्टाने
8 नष्ट झाले

9 निद्रा व जागृती

10 मुक्त अंतःकरणाला निग्रह करणे 11 व्यर्थ आहे

कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इन्द्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यतें ।।6।।

हस्तपादादि कर्मेंद्रिये आवरून मनाने जो मूढ इंद्रियांच्या विषयांचे चिंतन करीत रहातो,त्याला मिथ्याचार म्हणजे दांभिक म्हणतात.

जे उचित कर्म सांडिती , । मग नैष्कर्म्य होऊं पाहती , ।
परी कर्मेंद्रियप्रवृत्ति । निरोधुनि ।।64।।
तयां कर्मत्यागु न घडे , । जे कर्तव्य मनीं सांपडे ।
वरी नटती [1] , ते फुडे [2] । दरिद्र [3] जाण ।।65।।
ऐसे ते पार्था ! । विषयासक्त सर्वथा ।
ओळखावे , तत्त्वता ।भ्रांति नाही ।।66।।
आता देई अवधान । प्रसंगे तुज सांगेन ।
या नैराश्याचे चिन्ह । धनुर्धरा ! ।।67।।

1 सोंग आणतात
2 खरोखर 3 दैन्य

यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्याऽरभतेऽर्जुन ।
कर्मेन्द्रियैःकर्मयोगमसक्तः स विशिष्यते ।।7।।

पण मनाने इंद्रियांचे आकलन करून, केवळ कर्मेंद्रियांनी अनासक्त बुद्धिने जो कर्म योगाचा आरंभ करितो त्याची योग्यता हे अर्जुना ! विशेष आहे.

जो अंतरी दृढ , । परमात्मरूपी गूढ [4] ।
बाह्य भागु तरी रूढ [5] । लौकिकु [6] जैसा ।।68।।
जो इंद्रिया आज्ञा न करी , । विषयांचे भय न धरी , ।
प्राप्त कर्म नाव्हेरी , । उचित जे , जे , ।।69।।
तो , कर्मेंद्रियें कर्मी ।राहटता [7] , तरी न नियमी ।
परी तेथिचेनि उर्मी [8] ।झांकोळेना [9] ।।70।।
तो कामनामात्रे [10] न घेपे [11] , । मोहमळे न लिंपे ,।
जैसे , जळी जळे न शिंपे । पद्मपत्र ।।71।।
तेसा , संसर्गामाजी असें , । सकळासारिखा दिसे , ।
जैसे , तोयसंगे आभासे । भानुबिंब ।।72।।
तैसा , सामान्यत्वे पाहिजें , । तरी साधारणुचि देखिजे ।
येरवि , निर्धारिता , नेणिजें ।सोय[12] जयाची ।।73।।
ऐशा चिन्ही चिन्हितु ।देखसी , तोचि मुक्तु ।
आशापाशरहितु ।वोळख पां ।।74।।
अर्जुना ! तोचि योगी । विशेषिजें , जो , जगी ।
म्हणौनि , ' ऐसा होय ' , यालागी । म्हणिपे तूतें ।।75।।
तूं मानसा नियमु करी , । निश्चळु होय अंतरी , ।
मग , कर्मेंद्रियें व्यापारी [13] । वर्ततु सुखे ।।76।।

4 गढलेला
5 सामान्य 6 व्यवहारी
माणसाप्रमाणे
7 वर्तता
8 विकार 9 लिप्त होणे
10 कोणतीही इच्छा
11 ग्रस्त होणे
12 स्थिती
13 कर्मात

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मण : ।
शरीरयात्राऽपि च ते न प्रसिध्येदकर्मण : ।।8।।

तुझ्या धर्माप्रमाणे नियत म्हणजे नेमलेले कर्म तु कर, कारण कर्म न करण्यापेक्षां कर्म करणे हे अधिक चांगले होय. खेरीज असे पहा की कर्म न केलेस तर खायला न मिळता तुझा शरीरनिर्वाह सुध्दा चालावयाचा नाही.

म्हणौनि , नैष्कर्म्य होआवे । तरी एथ ते न संभवे , ।
आणि निषिध्द केवी राहाटावे [14] ? । विचारी पां ? ।।77।।

14 वागावे

म्हणौनि , जे , जे उचित , । आणि अवसरेकरूनि प्राप्त ,।
ते कर्म , हेतुरहित । आचरे तूं ।।78।।
पार्था ! आणीकही एक । नेणसी तूं हे कवतिक [1] , । 1 विशेष
जे , ऐसे कर्ममोचक [2] । आपैसे असे ।।79।। 2 मुक्ती देणारे
देखै , अनुक्रमाधारे [3]। स्वधर्मु जो आचरे , । 3 वर्णक्रमाचे आधारे
तो , मोक्षु , तेणे व्यापारे । निश्चित पावे ।।80।।

यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धन :।
तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसङ्ग : समाचर ।।9।।

यज्ञासाठी जे कर्म करितात त्याखेरीज इतर कर्माने हा लोक बांधिलेला आहे.तदर्थ म्हणजे यज्ञार्थ करावयाचे कर्म देखील तूं आसक्ति किंवा फलाशा सोडुन करीत जा.

स्वधर्मु जो बापा ! । तोचि नित्ययज्ञु जाण पां ।
म्हणौनि , वर्तता तेथ , पापा । संचारु नाही ।।81।।
हा निजधर्म जै सांडे , ।आणि कुकर्मी रति घडे , ।
तैचि बंधु पडे । संसारिक ।।82।।
म्हणौनि , स्वधर्मानुष्ठान , । ते अखंड , यज्ञ याजन ।
जो करी , तया बंधन । कहीच न घडे ।।83।।
हा लोकु कर्मे बांधिला । जो परतंत्रा [4] भूत [5] झाला , । 4 दुसऱ्याच्या आधीन 5 होणे
तो , नित्य यज्ञाते चुकला ।म्हणौनिया ।।84।।
आतां येचिविशीं पार्था ! ।तुज सांगेन एक मी कथा ।
जै सृष्ट्यादि संस्था [6] । ब्रह्मेने केली ।।85।। 6 रचना

सहयज्ञा : प्रजा : सृष्ट् वा पुरोवाच प्रजापति : ।
अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक् ।।10।।

पूर्वि यज्ञासह प्रजा उत्पन्न करुन ब्रह्मदेव त्यास म्हणाला की ' या यज्ञाच्या योगाने तुम्ही वृद्धि पावा.हा तुमची कामधेनु म्हणजे इच्छित मनोरथ पूर्ण करणारा होवो.'

तै , नित्ययागसहितें [7] । सृजिली भूते समस्ते । 7 नित्य यज्ञाबरोबर
परी , नेणतीचि तिये यज्ञातें , । सूक्ष्म [8] म्हणौनि ।।86 ।। 8 चटकन न समजणारा
ते वेळी , प्रजी विनविला ब्रह्मा ,। ' देवा ! काय आश्रयो एथ आम्हा ? ' ।
तंव म्हणे , तो कमळजन्मा । भूताप्रति ।।87।।
' तुम्हा , वर्णविशेषवशे [9] । आम्ही हा स्वधर्मुचि विहिला [10] असें,। 9 योग्यतेप्रमाणे 10 निश्चित केला
याते उपासा , मग आपैसे । पुरती काम ।।88।।

तुम्ही व्रते नियमु न करावे , । शरीराते न पीडावे , ।
दुरी केही न वचावे [1] ।तीर्थासी गा ! ।।89।।
योगादिके साधने , ।साकांक्ष[2] आराधने ,[3] ।
मंत्रयंत्र विधाने [4] । झणी करा [5] ।।90।।
देवतांतरा न भजावे , । हे सर्वथा काही न करावे , ।
तुम्ही स्वधर्मयज्ञी यजावे ।अनायासे [6] ।।91।।
अहेतुके [7] चित्ते । अनुष्ठा पां ययातें ।
पतिव्रता पतीतें । जियापरी ।। 92।।
तैसा , स्वधर्मरुपमखु [8] । हाचि सेव्यु तुम्हा एकु ' ।
ऐसे सत्यलोकनायकु । बोलता जाहला ।। 93।।
' देखा , स्वधर्माते भजाल । तरी कामधेनु हा होईल ।
मग , प्रजाहो ! न संडील [9] । तुमते कदा ।।94।।

1 जाणे
2 आशा धरून 3 आराधना
4 मंत्र तंत्रक्रिया 5 नका करु
6 सहजपणे
7 निष्काम
8 स्वधर्मरूपी यज्ञ
9 सोडेल

देवान्भावयताऽनेन ते देवा भावयंतु व : ।
परस्परं भावयंत : श्रेय : परमवाप्स्यथ ।।11।।

या यज्ञाने देवांची तुम्ही संभावना म्हणजे समृद्धि करीत जा; व ते देव उलट तुमची समृद्धि करोत. या प्रमाणे परस्परांची संभावना करीताना दोघेहि परम श्रेय म्हणजे कल्याण प्राप्त करुन घ्या.

जै , येणेकरुनि समस्तां ।परितोषु [10] होईल देवता ,।
मग , ते तुम्हा ईप्सिता[11] ।अर्थाते[12] देती ।। 95।।
या स्वधर्मपूजा पूजिता । देवतागणां (देवगण) समस्ता ,।
योगक्षेमु निश्चिता ।करिती तुमचा ।। 96।।
तुम्ही देवांते भजाल , ।देव तुम्हा तुष्टतील ,।
ऐसी , परस्परे घडेल ।प्रीती जेथ ।। 97।।
तेथ तुम्ही जे करु म्हणाल ,।तें , आपैसे सिद्धि जाईल ।
वांछितही [13] पुरेल । मानसीचे ।। 98 ।।
वाचासिध्दि पावाल [14] । आज्ञापक होआल ।
म्हणिये तुमते मागतील [15] । महाऋद्धि ।।
जैसे , ऋतुपतीचे [16] द्वार । वनश्री [17] निरंतर ।
वोळगे [18] , फळभार [19] ।लावण्येसी [20] ।।100।।

10 संतोष
11 ईच्छा 12 मागीतलेली
13 इच्छित
14 प्राप्त होणे
15 तुमची आज्ञा मागतील
16 वसंतऋतु 17 वनाची शोभा
18 सेवा करणे 19 फळाचा बहर 21 सौंदर्यान

इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यंते यज्ञभाविताः ।
तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुंक्ते स्तेन एव स : ।।12।।

कारण,यज्ञाने संतुष्ट झालेले देव इच्छिलेले सर्व भोग तुम्हाला देतील. त्यांनी दिलेले त्याना परत न देता जो केवळ स्वतःच उपभोगतो तो खरोखरच चोर होय.

तैसे , सर्व सुखेसहित ।दैवचि मूर्तिमंत ।
येईल देखा काढत ।तुम्हापाठी ।।101।।
ऐसे समस्त भोगभरित ।होआल तुम्ही अनार्त [1] ।
जरी स्वधर्मेनिरत [2] ।वर्ताल बापा ।।102।।
कां , जालिया सकळ संपदा [3] । जो अनुसरेल इंद्रियमदा [4] ।
लुब्ध होऊनियां स्वादा [5] ।विषयांचिया ।।103।।
तिही यज्ञभाविकी [6] सुरी [7] ।जे हे संपत्ति दिधली पुरी [8]।
तयां , स्वधर्मी सर्वेश्वरी । न भजेल जो , ।। 104।।
अग्निमुखी हवन , । न करील देवता पूजन , ।
प्राप्तवेळे भोजन । ब्राह्मणाचे ।। 105 ।।
विमुख होईल गुरुभक्ती ,।आदर न करील अतिथी ,।
संतोष नेदील ज्ञाती [9] । आपुलिये ।। 106 ।।
ऐसा स्वधर्मक्रियारहितु , । आथिलेपणे [10] प्रमत्तु ,।
केवळ भोगासक्तु । होईल जो ,।।107।।
तया मग अपावो थोर आहे , ।जेणे ते हातीचे सकळ जाये , ।
देखा , प्राप्तही न लाहे । भोग भोगु ।। 108 ।।
जैसे गतायुषी शरीरी , । चैतन्य वासु न करी ।
कां , निदैवाच्या [11] घरी । न राहे लक्ष्मी ।। 109 ।।
तैसा , स्वधर्मु जरी लोपला , । तरी सर्व सुखांचा थारा [12] मोडला ।
जैसा , दीपासवे हरपला । प्रकाशु जाय ।।110।।
तैसी ,निजवृत्ति [13] जेथ सांडे ,। तेथ स्वतंत्रतें [14] वस्ती [15] न घडे ,।
आईका , प्रजाहो ! हे फुडे [16] '। विरंचि [17] म्हणे ।। 111।।
म्हणौनि , स्वधर्मु जो सांडील , । तयाते काळु दंडील , ।
चोरु म्हणौनि हरील ।सर्वस्व तयाचे ।।112।।
मग , सकळ दोषु भंवते । गिवसोनि घेति तयातें ।
रात्रिसमयी स्मशानातें , । भूते जैसी ।।113।।
तैसी त्रिभुवनीची दुःखे ,। आणि नानाविधे पातके , ।
दैन्यजात तितुके । तेथेचि वसे ! ।। 114।।
ऐसे होय तया उन्मत्ता , । मग न सुटे , बापा ! रुदतां [17] ।
कल्पांतीही ,सर्वथा । प्राणिगणहो ।।115।।
म्हणौनि , निजवृत्ती हे न संडावी । इंद्रिये बरळो [18] नेदावी ' ।
ऐसे प्रजांते शिकवी ।चतुराननु ।।116।।
जैसे , जळचरा जळ सांडे । आणि तत्क्षणी मरण मांडे , ।
हा स्वधर्मु तेणे पाडे , । विसंबो नये ।।117।।

1 दुःखरहित
2 स्वधर्मातच केवळ रमलेले
3 भोग समृध्दि 4 इंद्रियांचा
उन्मत्तपणा 5 रुची
6 यज्ञाने समृध्द झालेला
7 देव 8 पूर्ण
9 जात
10 संपन्नतेने
11 दुर्दैवी
12 आधार
13 स्वधर्माचारण
14 स्वा धीनता 15 वास्तव्य
16 खरोखर 17 ब्रम्हदेव
17 रडणे
18 भलतीकडे जाणे

म्हणौनि , तुम्ही समस्ती , । आपुलालिया कर्मी उचिती , ।
निरत व्हावे ' पुढत पुढती । म्हणिपत असें ।।118।।

यज्ञशिष्टाशिनः सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषै : ।
भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात् ।।13।।

यज्ञ करुन अवशिष्ट राहिलेल्या भागाचे ग्रहण करणारे सद् गृहस्थ सर्व पापापासून मुक्त होतात परंतु यज्ञ नकरता केवळ आपल्यासाठी जे अन्न शिजवितात ते पापी लोक पाप भक्षण करितात

देखा , विहित क्रियाविधि । निर्हेतुका बुद्धि ।
जो , असतिये समृद्धि । विनियोगु करी , ।। 119 ।।
गुरु , गोत्र (गो) , अग्नि , पूजी , । अवसरी भजे द्विजी , ।
निमित्तादिकी यजी । पितरोद्देशे ।।120।।
या यज्ञ क्रिया उचिता , । यज्ञेशी हवन करितां , ।
हुतशेष [1] स्वभावतः ।उरे जें , जें ,।।121।। — 1 हवन करून उरलेले
ते , सुखे आपुले घरी । कुटुंबेसी भोजन करी ,।
की , भोग्यचि ते निवारी ।कल्मषातें [2] ।।122।। — 2 पाप
ते यज्ञावशिष्ट , भोगी , ।म्हणौनि , सांडिजे तो अधी [3] । — 3 पाप
जयापरी , महारोगी । अमृतसिद्धि ।।123।।
की , तत्त्वनिष्ठु जैसा ।नागवे [4] भ्रांतिलेशा [5] , । — 4 सापडत नाही 5 अल्पसा भ्रम
तो ' शेषभोगी ' तेसा । नाकळे दोषा ।।124।।
म्हणौनि , स्वधर्मे जे अर्जे [6] , ।ते स्वधर्मेचि विनियोगिजे । — 6 प्राप्त होते
मग , उरे ते , भोगिजे । संतोषेसी ।।125।।
हे वाचूनि , पार्था ! । राहाटो नये अन्यथा ।
ऐसी , आद्य हे कथा , । श्रीमुरारी सांगे ।।126।।
जे देहचि आपणपे मानिती , । आणि विषयांते भोग्य म्हणती , ।
यापरते न स्मरती ।आणिक कांहीं , ।।127।।
हे यज्ञोपकरण [7] सकळ । नेणतसा [8] , ते बरळ [9] ,। — 7 यज्ञाची साधने 8 जाणत नाहीत
अहंबुद्धि [10] केवळ । भोगु पाहती ! ।।128।। — 9 व्यर्थ 10 अहंभावाने
इंद्रियरुचीसारिखे ।करविती पाक निके ,।
ते पापिये , पातके ।सेविती , जाण ।।129।।
संपत्तिजात आघवे । हे हवनद्रव्य मानावे , ।
मग , स्वधर्मयज्ञे अर्पावे । आदिपुरुषी ।।130।।
हे सांडोनिया , मूर्ख । आपणपे यालागी , देख , ।
निपजविती पाक । नानाविध ।।131।।

जिही यज्ञु सिद्धि जाये , । परेशा [1] तोषु होये , ।
ते हे सामान्य अन्न न होये । म्हणौनिया ! ।।132 ।।
हे न म्हणावे साधारण , । अन्न ब्रह्मरुप जाण ।
जे जीवनहेतु कारण । विश्वा यया ।।133।।

1 परमेश्वराला

अन्नाद् भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसंभव : ।
यज्ञाद् भवति पर्जन्यो यज्ञ :कर्मसमुद्भव : ।।14।।
कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ।
तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्टितम् ।।15।।

प्राणिमात्र अन्नापासून होतात; अन्न पर्जन्यापासून उद्भवते; पर्जन्य यज्ञापासून होतो; व यज्ञाचा उद्भव कर्मापासून होतो. कर्माची उत्पत्ति ब्रह्मापासून म्हणजे प्रकृतीपासून आहे असे जाण आणि हे ब्रह्म अक्षरापासून म्हणजे परमेश्वरा पासून निघाले आहे. म्हणून सर्वगत ब्रह्मच नेहमी यज्ञात अधिष्टित असते असे समज.

अन्नास्तव भूतें । प्ररोहो [2] पावती समस्ते ।
मग , पर्जन्यु या अन्नाते । सर्वत्र प्रसवे ।।134।।
तया पर्जन्या , यज्ञी जन्म , । यज्ञाते प्रगटी कर्म ।
कर्मासि आदि ब्रह्म । वेदरुप ।।135।।
तया वेदांते , परात्पर [3] । प्रसवतसे अक्षर [4] ।
म्हणौनि , हे चराचर ।ब्रह्मबध्द [5] ।।136।।
परी कर्माचिये मूर्ति [6] , । यज्ञी अधिवासु [7] श्रुति ।
ऐके सुभद्रापति ! । अखंड गा ।।137।।

2 वाढतात
3 पलीकडचे व अलीकडचे 4 ओंकार
5 ब्रह्माशी संबधीत असलेले
6 आकार 7 अधिष्ठान

एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह य : ।
अघायुरिंद्रियारामो मोघं पार्थ स जीवति ।।16।।

याप्रमाणे जगाच्या धारणार्थ सुरु केलेले चक्र म्हणजेच कर्माचे अगर यज्ञाचे रहाटगाडगे या जगांत जो पुढे चालवीत नाही, त्याचे आयुष्य पापरुप असून या इंद्रियलंपटाचे म्हणजे देवांना न देता स्वतःच चैन करणांराचे जिणे हे पार्था! व्यर्थ होय !

ऐशी , हे आदि परंपरा । संक्षेपे [8] , तुज , धनुर्धरा ! ।
सांगितली , या अध्वरा [9] । लागूनिया ।।138।।
म्हणौनि , समूळ हा उचितु । स्वधर्मरुप क्रतु [10] ।
नानुष्ठी [11] , जो मत्तु [12] । लोकी इये , ।।139।।
तो पातकांची राशी । जाण , भार , भूमीसी ।
जो कुकर्मे , इंद्रियांसी ।उपेगा गेला , ।।140।।

8 विस्ताराने
9 यज्ञ
10 यज्ञ
11 आचरत नाही 12 उन्मत्त

ते , जन्मकर्म, सकळ । अर्जुना ! अति निष्फळ , ।
जैसे का अभ्रपटल , । अकाळीचे [1] ।।141।।
कां , गळा स्तन अजेचे [2] । तैसें , जियाले देखै तयाचे ।
जया , अनुष्ठान स्वधर्माचे । घडेचिना ।।142।।
म्हणौनि , ऐके पांडवा ! । हा ' स्वधर्मु ' कवणे न संडावा , ।
सर्वभावे भजावा । हाचि एकु ।।143।।
हां गा ! शरीर जरी जाहले , । तरी कर्तव्य वोघे आले ।
मग , उचित का आपुले ।ओसंडावे ?[3] ।।144।।
परिस पां सव्यसाची ! । मूर्ति लाहोनि देहाची , ।
खंती [4] करिती कर्माची , । ते गावंढे [5] गा ! ।।145।।

1 अयोग्य वेळचे
2 शेळी
3 टाकून द्यावे
4 कंटाळा 5 अज्ञानी

यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानव : ।
आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ।।17।।
परंतु जो मनुष्य केवळ आत्म्यातच रत,आत्म्यातच तृप्त, आणि आत्म्याचे ठायीच संतुष्ट झाला त्याला स्वतःचे म्हणून काही कार्य शिल्लक रहात नसते;

देखै , असतेनि देहधर्मे , । एथ तोचि एकु न लिंपे कर्मे , ।
जो , अखंडित रमे । आपणपांचि ।।146।।
जे , तो आत्मबोधे तोषला ।तरी , कृतकार्यु देखै जाहला ।
म्हणौनि , सहजे सांडवला ।कर्मसंगु ।। 147।।

नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन ।
न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रय : ।।18।।
तसेच येथे म्हणजे या जगात एखादी गोष्ट केल्याने त्याचा काही नफा नसतो आणि न केल्यानेही नसतो , आणि सर्व भूतांचे ठायी त्याचा स्वतःचा म्हणून काही अर्थ गुंतुन राहिलेलां नसतो.

तृप्ति जालिया , जैसी ।साधने सरती आपैसी , ।
देखै , आत्मतुष्टी तैसी ।कर्मे नाही ।।148।।
जवंवरी अर्जुना ! ।तो बोधु भेटेना मना , ।
तंवची , यया साधना । भजावे लागे ।।149।।

तस्मादसक्त :सततं कार्यं कर्म समाचर ।
असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुष : ।।19।।
तस्मात म्हणजे ज्ञानी पुरुष याप्रमाणे कसलीच अपेक्षा ठेवीत नसल्यामुळे तूही फलाचे ठायी आसक्ति न ठेविता आपले कर्तव्यकर्म नेहमी करीत जा कारण आसक्ति सोडून कर्म करीत असणाऱ्या पुरुषाला परम गती मिळते.

म्हणौनि , तूं नियतु , । सकळ कामरहितु ।
होऊनियां ; उचितु ।स्वधर्मे रहाटे ।।150।।
जे स्वधर्मे निष्कामता ।अनुसरले , पार्था ! ।
ते कैवल्यपद तत्त्वतां [1] । पातले जगी ।।151।।

1 खरोखर

कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादय : ।
लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि ।।20।।

जनकादिकांनीहि याप्रमाणे कर्मानेच सिद्धि मिळवली.तसेच लोकसंग्रहाकडे दृष्टि देऊनहि तुला कर्म करणेच उचित होय.

देख पां ! जनकादिक ।कर्मजात अशेख ।
न सांडितां , मोक्षसुख ।पावते जाहले ।।152।।
याकारणे , पार्था ! । होआवी कर्मी आस्था ।
हे आणिकाही एका अर्था [2] । उपकारैल ।।153।।
जें आचरतां आपणपयां [3] ,। देखी ,लागेल लोका यया [4] ।
तरी , चुकेल अपाया , । प्रसंगेचि [5] ।।154।।
देखै , प्राप्तार्थ जाहले [6] , । जे निष्कामता पावले , ।
तयाही , कर्तव्य असे उरले ।लोकालागी ।।155।।
मार्गी अंधासरिसा , । पुढे देखणाही [7] चाले जैसा , ।
अज्ञाना प्रगटावा धर्मु तैसा , । आचरोनी ।।156।।
हा , गा ! ऐसे जरी न कीजें , । तरी अज्ञाना काय उमजें ? ।
तिही , कवणे परी जाणिजें ।मार्गाते या ? ।। 157।।

2 उद्देशाने
3 आत्मभावाने 4 लोकांना आवड लागेल 5 या निमित्ताने
6 पूर्णत्वास पोचलेले
7 डोळस

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जन : ।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ।।21।।

श्रेष्ठ म्हणजे आत्मज्ञानी पुरुष जे जे करितो ते तेच इतर म्हणजे सामान्य लोक करीत असतात.तो जी गोष्ट प्रमाण म्हणून अंगीकारितो तिलाच लोक अनुसरतात.

एथ वडील जे जे करिती , । तया नाम धर्मु ठेविती ।
तेचि , येर अनुष्ठिती ।सामान्य सकळ ।। 158 ।।
हे ऐसे असे स्वभावे , । म्हणौनि कर्म न संडावे ।
विशेषे आचरावे । लागे , संती ।।159।।

न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ।।22।।

हे पार्था! असे पहा की, माझे म्हणून त्रिभुवनात मला काहीहि कर्तव्य उरलेले नाही किंवा अप्राप्त अशी एखादी वस्तु मिळवावयाची राहिलेली नाही तथापि मी कर्मच करीत आहे.

आता , आणिकांचिया गोठी । कायशा सांगो , किरीटी ? ।
देखै , मीच इये राहाटी ।वर्तत असें ।। 160 ।।
काय सांकडे काही मातें ? ।की , कवणे एके आर्ते ।
आचरे मी धर्मातें ? । म्हणसी जरी ।। 161।।
तरी ,पुरतेपणालागी ।आणिकु दुसरा नाही जगी ।
ऐसी सामुग्री [1] माझ्या अंगी ।जाणसी तूं ।। 162।। 1 ऐश्वर्य
मृत गुरुपत्र आणिला , ।तो तुवा पवाडा [2] देखिला । 2पराक्रम
तोही मी ; उगला [3] । कर्मी वर्ते ।। 163 ।। 3 निवांत

यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतंद्रित : ।
मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वश : ।।23।।

कारण, मी जर कदाचित् कर्माच्या ठायी आळस सोडून वर्तणार नाही, तर सर्व मनुष्ये हे पार्था ! सर्व प्रकारे माझ्याच मार्गाचे अनुकरण करतील.

परी स्वधर्मी वर्ते कैसा ! ।साकांक्षु [4] कां होय जैसा । 4 काम्यवृत्तिने
तयाची एका उद्देशा- । लागोनियां ।।164।।
जें , भूतजात सकळ , । असे आम्हाचि आधीन केवळ , ।
तरी न व्हावे बरळ [5] , । म्हणौनिया ।।165।। 5 भलत्या मार्गाने जाऊ नये

उत्सीदेयुरिमे लोका न कुर्या कर्म चेदहम् ।
संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमा : प्रजा : ।।24।।

मी कर्म न केले तर हे लोक उत्सन्न म्हणजे नष्ट होतील,मी संकर करणारा होईन व या प्रजाजनांचा माझ्या हातून घात होईल.

आम्ही पूर्णकाम होउनी , ।जरी आत्मस्थिति राहुनी , ।
तरी , प्रजा हें कैसेनि । निस्तरेल [6] ? ।।166।। 6.तरुन जाईल
इही आमुची वास [7] पाहावी , । मग वर्ततीपरी[8] जाणावी , । 7 अपेक्षेने पहावे 8 वर्तन
ते लोकस्थिति आघवी , । नासिली होईल ।। 167।।
म्हणौनि , समर्थु जो येथे , ।आथिला [9] सर्वज्ञतें , । 9युक्त
तेणे , सविशेषे [10] , कर्माते । त्यजावे ना ।।168।। 10 विशेष करून

सक्ता :कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत ।
कुर्याद्विद्वांस्तथाऽसक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ।।25।।
हे अर्जुना! म्हणून लोकसंग्रह करुं इच्छिणाऱ्या ज्ञानी पुरुषाने व्यावहारिक कर्मात आसक्त झालेले अज्ञानी लोक ज्याप्रमाणे वागतात त्याप्रमाणे पण आसक्ति सोडून वागले पाहिजे.

देखै, फळाचिया आशा ,।आचरे कामकु जैसा ,।
कर्मी भरु [1] होआवा तैसा । निराशाही ।।169।। 1 जोर
जे, पुढतपुढती पार्था ! ।हे सकळ लोकसंस्था ।
रक्षणीय सर्वथा , । म्हणौनिया ।।170।।
मार्गाधारे वर्तावे , । विश्व हे मोहरे [2] लावावे । 2 मार्गी लावणे
अलौकिक नोहावे । लोकांप्रति ।।171।।

न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ।
जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्त : समाचरन् ।।26।।
कर्माच्या ठायी आसक्त झालेल्या अडाणी लोकांच्या बुद्धिचा ज्ञानी पुरुषाने भेद करु नये;आपण स्वतःयुक्त म्हणजे योगयुक्त व सर्व कर्मे करणारा होउन लोकांना ती खुषीने करावयास लावावी.

जे सायासे [3]स्तन्य सेवी , । ते पक्वान्ने केवी जेवीं ? । 3 कष्टाने
म्हणौनि , बाळका जैशी नेदावी । धनुर्धरा ! ।। 172।।
तैशी , कर्मी जयां अयोग्यता , ।तयाप्रति नैष्कर्म्यता ।
न प्रगटावी; खेळता । आदिकरुनी ।।173।।
तेथे सत्क्रियाचि लावावी , । तेचि एकी प्रशंसावी , ।
नैष्कर्मीही दावावी । आचरोनी ।। 174 ।।
तया लोकसंग्रहालागी [4] । वर्तता कर्मसंगी , । 4 लोककल्याणाकरता
तो कर्मबंधु , आंगी ।वाजैल ना [5] ।।175।। 5 बाधणार नाही
जैसी , बहुरुपियांची रावो ,राणी ,। स्त्रीपुरुषभावो नाही मनी ,।
परी , लोकसंपादणी [6] । तैशीच करिती ।। 176।। 6 लोकांकरता बतावणी

प्रकृते : क्रियमाणानि गुणै : कर्माणि सर्वश : ।
अहंकारविमुढात्मा कर्ताऽहमिति मन्यते ।।27।।
प्रकृतीच्या , सत्व,रज व तम या, गुणांनी सर्व प्रकारे कर्मे होत असतां, अहंकाराने अज्ञानी पुरुष मी कर्ता असे मानतो.

देखै , पुढिलाचे वोझे , । जरी आपुला माथां घेइजें , ।
तरी , सांगै , कां न दटिजे [7] ? । धनुर्धरा ! ।। 177 ।। 7 दडपून जाणे

तैशी , शुभाशुभे कर्मे , । जिये , निपजती , प्रकृतिधर्मे , ।
तिये , मूर्ख ,मतिभ्रमे , । ' मी कर्ता ' म्हणे ।। 178।।
ऐसा अहंकारादि रुढ , ।एकदेशी [1] मूढ , ।
तया , हा परमार्थ गूढ । प्रगटावा ना ।।179।।
हे असो ; प्रस्तुत । सांगिजैल तुज हित , ।
ते , अर्जुना ! देऊनि चित्त । अवधारी पां ।।180।।

1 एककल्ली

तत्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयो : ।
गुणा गुणेषु वर्तन्त इति मत्वा न सज्जते ।।28।।

परंतु हे महाबाहो अर्जुना !गुण आणि कर्मे ही दोन्ही आपल्याहून भिन्न आहेत हे तत्त्व जाणणारा ज्ञानी पुरुष, गुणांचा हा आपआपसांत खेळ चालला आहे असे समजून ,त्यात आसक्त होत नाही.

जें, तत्त्वज्ञानियांच्या ठायी , । प्रकृतिभावो [2] नाही , ।
जेथ कर्मजात , पाही ,। निपजत असें , ।।181।।
ते , देहाभिमानु सांडुनी ,। गुणकर्मे वोलांडुनि , ।
साक्षिभूत [3] होऊनि , । वर्तती देही ।।182।।
म्हणौनि , शरीरी जरी होती , । तरी कर्मबंधा नातळती ।
जैसा कां भूतचेष्टा , गभस्ती ।घेपवेना ।।183।।

2 इंद्रियभाव

3 केवळ पाहणारे

प्रकृतेर्गुणसंमूढाः सज्जन्ते गुणकर्मसु ।
तानकृत्स्नविदो मंदान्कृत्स्न विन्न विचालयेत् ।।29।।

प्रकृतीच्या गुणांनी वेडे झालेले लोक गुण व कर्मे यांतच आसक्त होत असतात; अशा असर्वज्ञ व मंद लोकांस सर्वज्ञ पुरुषाने आपल्या कर्मत्यागाने भलत्या मार्गास लावून बिघडवू नये.

एथ कर्मी तोचि लिंपे ,।जो गुणसंभ्रमे घेपे [4] ।
प्रकृतीचेनि आटोपे [5] । वर्ततु असें ।।184।।
इंद्रिये गुणाधारे । राहाटती , निजव्यापारे ।
ते परकर्म , बलात्कारे ।आपादी [6] जो ।।185।।

4 गुणाविषयी भ्रमाने ग्रस्त होतो
5 स्वाधीन होतो
6 स्वीकारणे

मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।
निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वर : ।।30।।

यासाठी हे अर्जुना! माझ्या ठायी अध्यात्म-बुद्धिने सर्व कर्माचा संन्यास म्हणजे अर्पण करुन आणि फलाची आशा व ममत्व सोडून तूं बिनदिक्कत युद्ध कर.

तरी उचिते कर्मे आघवी , । तुवा आचरोनि ; मज अर्पावी ।
परी , चित्तवृत्ति न्यासावी [1] ।आत्मरूपी ।। 186।। 1 ठेवावी
आणि हे कर्म , मी कर्ता ,। कां आचरैन या अर्था [2] , । 2 उद्दिष्टाने
ऐसा अभिमानु , झणे चित्ता । रिगो देसी ।।187।।
तुवा शरीरपरा [3] नोहावे , । कामनाजात सांडावे , । 3 देहपरायण
मग , अवसरोचित भोगावे । भोग सकळ ।।188।।
आतां , कोदंड घेऊनि हाती , । आरूढ पां इये रथी ।
देई आलिंगन वीरवृत्ती ।समाधाने ।।189।।
जगी कीर्ति रुढवी , । स्वधर्माचा मानु वाढवी ।
इया भारापासोनि सोडवी । मेदिनी [4] हे ।।190।। 4 पृथ्वी
आता पार्था ! निःशंकु होई , । या संग्रामा चित्त देई ।
एथ , हे वाचूनि काही । बोलो नये ।। 191 ।।

ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठन्ति मानव : ।
श्रद्धावन्तोऽनसूयन्तो मुच्यन्ते तेऽपि कर्मभि : ।।31।।
दोष काढीत न बसता जे श्रद्धावान पुरुष माझ्या या मताप्रमाणे नित्य वर्तन करितात, तेहि कर्मापासून म्हणजे कर्मबंधापासून मुक्त होतात.

हे अनुपरोध [5] मत माझें ।जिही परमादरे स्वीकारिजें , । 5 स्पष्ट
श्रद्धापूर्वक अनुष्ठिजें ।धनुर्धरा ! ।।192 ।।
तेही, सकळ कर्मी वर्ततु ,। जाण पां ! कर्मरहितु , ।
म्हणौनि , हे निश्चितु । करणीय गा ! ।।193।।

ये त्वेतदभ्यसूयन्तो नानुतिष्ठन्ति मे मतम् ।
सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतस : ।।32।।
परंतु दोष-दृष्टीने विकल्प काढून या माझ्या मताप्रमाणे जे वर्तन करीत नाहीत ते सर्वज्ञान- विमूढ म्हणजे पक्के मूर्ख अविवेकी बुडाले म्हणून समज.

नातरी , प्रकृतिमंतु होउनी , । इंद्रिया लळा देउनी , ।
जे , हे माझे मत अव्हेरुनी , । ओसंडिती [6] , ।।194 ।। 6 टाकतात
जे सामान्यत्वे लेखिती ,। अवज्ञा करुनि देखती ,।
कां , हा अर्थवादु [7] म्हणती । वाचाळपणे , ।। 195।। 7 अतिशयोक्तिपूर्ण बोलणे
ते , मोहमदिरा भुलले , । विषयविखे धारले , ।
अज्ञानपंकी बुडाले । निभ्रांत मानी ।।196।।

देखै ,शवाच्या हाती दिधले ,।जैसे ,रत्न कां वायां गेलें ,।
नातरी , जात्यंधा पाहले ! ।प्रमाण नोहे ।।197।।
कां ,चंद्राचा उदयो , जैसा । उपयोगा न वचे वायसा [1] ।
मूर्खा , विवेकु हा तैसा , । रुचेला ना ।।198।।
तैसे जे , पार्था ! । विमुख या परमार्था ,।
तयांसी संभाषण सर्वथा । करावेना ।।199 ।।
म्हणौनि , ते न मानिती ,। आणि निंदाही करु लागती , ।
सांगै , पतंगु काय साहती ।प्रकाशाते ? ।। 200।।
पतंगा दीपी आलिंगन , । तेथ त्यासी अचुक मरण ।
तेवी , विषयाचरण । आत्मघाता ।।201 ।।

1 कावळा

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।
प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति ।।33।।

ज्ञानवान् पुरुष सुद्धा आपल्या प्रकृतिस्वभावानुरुप वागतो. सर्वच भूते आपआपल्या प्रकृतीच्या वळणावर जातात, तेथे निग्रह म्हणजे जबरी काय करणार ?

म्हणौनि , इंद्रिये एकें । जाणतेनी पुरुखे ।
लाळावी ना ; कौतुकें । आदिकरुनी ।।202।।
हां गा , सर्पेसी खेळो येईल ? । की व्याघ्रसंसर्ग सिद्धि जाईल ? ।
सांगै , हाळाहाळ जिरेल ।सेविलिया काई ?।।203।।
देखै , खेळता अग्नि लागला , । मग तो न सांवरे , जैसा उधवला ।
तैसा , इद्रिया लळा दिधला , । भला नोहे ! ।।।204।।
एऱ्हवी तरी , अर्जुना ! । या शरीरा पराधीना , ।
कां नाना भोगरचना [2] ।मेळवावी ?।।205।।
आपण सायासेकरूनि बहुतें , ।सकळही समृद्धिजाते , ।
उदोअस्तु [3] या देहाते । प्रतिपाळावे कां ? ।।206।।
सर्वस्वे शिणोनि , एथे ।अर्जवावी [4] संपत्तिजातें , ।
तेणे स्वधर्मु सांडुनि , देहाते।पोखावे [5] काई ?।। 207।।
मग , हे तंव पांचमेळावा [6] । शेखी [7] अनुसरेल पंचत्वा ,।
ते वेळी , केला के गिवसावा [8] ।शीणु आपुला ?।।208।।
म्हणौनि , केवळ देहभरण ,।ते जाणे उघडी नागवण ।
यालागी , एथ अंतःकरण ।देयावेना ।।209।।

2 विषयभोगाची जुळवाजुळव
3 सकाळपासून सायंकाळपर्यंत
4 मिळवणे
5 पोसणे
6 पाचांचा मेळावा 7 शेवटी
8 शोधावा

इंद्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ ।
तयोर्न वशमागच्छेतौ ह्यस्य परिपंथिनौ ।।34।।

इंद्रिय आणि त्याचे शब्दस्पर्शादि विषय यांच्यामधील प्रीती व द्वेष ही दोन्ही व्यवस्थित म्हणजे मूळचीच ठरलेली आहेत. या प्रीतीद्वेषाच्या ताब्यात आपण जाउ नये कारण ते मनुष्याचे वाटमारे शत्रु होत.

एऱ्हवी , इंद्रियांचिया अर्था-।सारिखा विषो पोखितां ,।
संतोषु कीर चित्ता । आपजेल ? ।।210।।
परी तो संवचोराचा [1] सांगातु [2] ,।जैसा , नावेक [3] स्वस्थु।
जंव नगराचा प्रांतु ।सांडिजेना ।।211।।
बापा ! विषाची मधुरता , । झणे [4] आवडी उपजे चित्ता! ।
परी , तो परिणामु विचारितां ,। प्राणु हरी ।।212।।
देखै , इंद्रियी कामु असें , ।तो लावी सुखदुराशे [5] ।
जैसा , गळी ,मीनु ,आमिषे । भुलविजे गा ।। 213 ।।
परी , तयामाजी गळु आहें , । जो प्राणाते घेऊनि जाये , ।
तो जैसा ठाउवा नोहे [6] । झाकलेपणे ।। 214।।
तैसे , अभिलाषे येणे कीजेल ,। विषयांची आशा धरिजेल ,।
तरी , वरपडा होईजेल । क्रोधानळा ।।215।।
जैसा , कवळोनिया [7] , पारधी । घातेचिये संधी [8] ।
आणी मृगाते बुद्धि [9] ,। साधावया [10]।।216।।
एथ , तैसीचि परी आहें । म्हणौनि , संगु हा तुज नोहे ।
पार्था ! दोन्ही कामक्रोध हें । घातुक जाणे ।।217।।
म्हणौनि , हा आश्रोचि न करावा ,। मनेहि आठवो न धरावा ।
एकु निजवृत्तीचा वोलावा [11]। नासो नेदी ।।218।।

1 सभ्य दिसणारा
चोर 2 संगत 3 क्षणभर
4 ताबडतोब
5 सुखाची खूप इच्छा
6 ठाऊक नसते
7 घेरून
8 मारता येईल अशा जागी
9 हेतुपुरस्पर 10 मारावया
11 आत्मसुखाच्या अनुभवाचा ओलावा

श्रेयान्स्वधर्मोविगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मौ भयावहः ।।35।।

परक्याचा धर्म सुखाने आचरिता आला तरी त्यापेक्षा आपला धर्म म्हणजे चातुर्वर्ण्यविहित कर्म विगुण म्हणजे सदोष असले तरी तेच अधिक श्रेयस्कर आहे. स्वधर्माप्रमाणे वागत असता मरण आले तरी त्यात कल्याण आहे परंतु परक्याचा धर्म भयंकर होय !.

अगा ! स्वधर्मु हा आपुला , । जरी कां कठिणु जाहला , ।
तरी हाचि अनुष्ठिला । भला ; देखै ।।219 ।।
येरु , आचारु जो परावा ।तो देखता कीर बरवा ।
परी आचरतेनि , आचरावा । आपुलाचि ।। 220।।
सांन्ने [12] , शूद्र घरी , आघवी । पक्वान्ने आहाति बरवी ,।
ती , द्विजे केवी सेवावी ?। दुर्बळु जरी जाहला ! ।।221।।

12 हलक्या प्रतीचा

हे अनुचित कैसेनि कीजे ? । अग्राह्य केवी इच्छिजें ? ।
अथवा इच्छिलेही पाविजे ? ।विचारी पां ! ।।222।।
तरी लोकांची धवळारे [1] । देखोनिया , मनोहरे । 1 चुनेगच्ची घर
असती आपुली तणारे [2] । मोडावी केवी ? ।।223।। 2गवताची झोपडी
हे असो ; वनिता आपुली । कुरुप जरी जाहली , ।
तऱ्ही , भोगिता तेचि भली , । जियापरी ।।224।।
तेवी , आवडे तैसा सांकडु [3] , । आचरता जरी दुवाडु [4] , । 3 त्रासदायक 4 कठीण
तऱ्ही , स्वधर्मुचि सुरवाडु [5] ।परत्रीचा ।।225।। 5सोपा
हां गा ! साकर आणि दूध ,। हे गौल्य [6] कीर प्रसिद्ध । 6 गोडी
परी , कृमिदोषी , विरुध्द । घेपे केवी ? ।।226।।
ऐसेनिही जरी सेविजेल , । तरी ते अळुकीचि [7] उरेल । 7आग्रह
जें , ते परिणामी पथ्य नव्हेल । धनुर्धरा ! ।।227।।
म्हणौनि , आणिकासी जे विहीत , । आणि आपणपेया अनुचित , ।
ते नाचरावे ; जरी हित ।विचारिजें ।।228।।
या स्वधर्माते अनुष्ठितां , । वेचु [8] होईल जीविता । 8 खर्च
तोहि निका [9] ; वर उभयतां ।दिसत असें ।।229।। 9 चांगला
ऐसे समस्त सुरशिरोमणी । बोलिले जेथ शाङर्गपाणी ।
तेथ अर्जुन म्हणे , ' विनवणी ।असे देवा ।। 230।।
हे जे तुम्ही सांगितले ।ते सकळ कीर म्यां परिसले ।
तरी आता ,पुसेन काही आपुले । अपेक्षित ।।231।।

अर्जुन उवाच

अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः ।
अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ।।36।।

हे वार्ष्णेया म्हणजे श्रीकृष्णा ! आतां असे सांगा की स्वतःची इच्छा नसताहि बलात्कार केल्याप्रमाणे मनुष्य पाप करितो ते कोणाच्या प्रेरणेने ?.

' तरी देवा ! हे ऐसे कैसे ?। जे ज्ञानियांही स्थिति भ्रंशे ।
मार्गु सांडुनी , अनारिसे [10] ।चालत देखो ? ।। 232।। 10 भलता
सर्वज्ञुही जे होती , । हेयोपदेयही [11] जाणती , । 11 त्याज्य व संकटकारक
तेही , परधर्मे व्यभिचरति । कवणे गुणे ? ।। 233 ।।
बीजा आणि भूसा , । अंधु निवाडु नेणे जैसा ।
नावेक देखणाही , तैसा । बरळे कां पां ? ।। 234।।
जें , असता संगु सांडिती , । तेचि संसर्गु करिता , न धाती [12] । 12 मागेपुढे पहात नाहीत
वनवासीही सेविती ।जनपदातें [13] ।।235।। 13 वस्ति

आपण तरी लपती ।सर्वस्वे पाप चुकविती ।
परी , बळात्कारे सुइजती । तयाचि माजी ।।236।।
जयाची जीवे घेती विवसी [1] , । तेचि जडोनि ठाके जीवेसी । 1 हडळ
चुकविता , ते गिवसी ।तयातेचि ।।237।।
ऐसा बलात्कारु एकु दिसें ,। तो कवणाचा एथ आग्रहो असें ? ।
हे बोलावे हृषीकेशे '' । पार्थु म्हणे ।।238।।

श्रीभगवान् उवाच
काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः ।
महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ।।37।।

श्रीभगवान म्हणाले या बाबतीत रजोगुणापासून उत्पन्न झालेला मोठा अधाशी व पापी असा हा काम व हा क्रोध हाच शत्रु असे समज.

तव हृदयकमळआरामु , । जो योगियांचा निष्कामकामु , ।
तो म्हणतसे पुरुषोत्तमु । ' सांगेन आइक ।। 239।।
तरी हे काम क्रोधु , पाही ।जयांते कृपेची सांठवण नाही [2] । 2 थोडीसुद्धा दया नाही
हे , कृतांताच्या ठायी । मानिजती ।।240।।
हे ज्ञाननिधीचे भुजंग ,। विषयदरीचे वाघ ।
भजनमार्गीचे मांग । मारक जें ।। 241।।
हे देहदुर्गीचे धोंड [3] । इंद्रियग्रामीचे कोंड [4] । 3 मोठे दगड 4 कोंडवाडे
यांचे व्यामोहादिक [5] दबड [6] । जगावरी ।।242 ।। 5 मोहादीक 6 प्रभाव
हे रजोगुण मानसीचे ।समूळ आसुरियेचे ।
धालेपण [7] ययांचे । अविद्या केले ।।243।। 7 यांची तृप्ती
हे रजाचे कीर जाहले, । परी तमासी पढियंते भले ,।
तेणे निजपद [8] यां दिधले । प्रमादमोहो ।। 244 ।। 8 आपला आश्रय
हे मृत्यूच्या नगरी ,। मानिजती निकियापरि [9] । 9 चांगले प्रसिद्ध असतात
जे , जीविताचे वैरी ।म्हणौनिया ।। 245 ।।
जयांसी भुकेलिया , आमिषा ।हे विश्व न पुरेची घासा , ।
कुळवाडियांचिया [10] आशा ।चाळीत [11] असें ।।246 ।। 10 जमीन घेऊन कसणारा
कौतुके कवळिता , मुठी , । जिये चवदा भुवने थेकुटी , । 11 चाळवणे
तिये , भ्रांतिही धाकुटी । वाल्हीदुल्ही [12] ।। 247।। 12 लाडकी
जे लोकत्रयाचे भातुके [13] ,। खेळतांचि खाय कवतिके । 13 मुलांचा खाऊ
तिच्या दासीपणाचेनि बिके [14] । तृष्णा जिये ।।248।। 14 सामर्थ्य

हे असो , मोहे मानिजें , । यांते अहंकारे घेपे दीजें , ।
जेणे , जग आपुलेनि भोजें [1] । नाचवीत असें ।।249।।
जेणे सत्याचा भोकसा [2] काढिला ,।मग अकृत्य तृणकुटा भरिला ,।
तो दंभु रुढविला । जगी इही ।।250।।
साध्वी शांति नागविली , । मग माया मांगी [3] शृंगारिली , ।
तियेकरवी विटाळविली । साधुवृंदे ।।251।।
इही विवेकाची त्राय [4] फेडिली , । वैराग्याची खाल काढिली ।
जितया मान मोडिली । उपशमाची [5] ।।252।।
इही संतोषवन खांडिले , । धैर्यदुर्ग पाडिले , ।
आनंदरोप सांडिले । उपडूनिया ।।253।।
इही बोधाची रोपे लुंचिली [6] । सुखाची लिपी पुसिली ।
जिव्हारी , आगी सूदली ।तापत्रयाची ।।254।।
हे आंगा तंव घडले , ।जीवीची आथी जडले ।
परी नातुडती [7] गिवसिले । ब्रह्मदिकां ! ।।255।।
हे चैतन्याचे शेजारी ।वसती ज्ञानाच्या एका हारी [8] ।
म्हणौनि , प्रवर्तले महामारी ।सांवरती ना ।।256।।
हे जळेविण बुडविती , ।आगीवीण जाळिती , ।
न बोलतां कवळिती , । प्राणियाते ।।257।।
हे शस्त्रेवीण साधिती [9] , । दोरेवीण बांधिती ।
ज्ञानियांसी तरी वधिती ।पैज घेऊनि ।।258।।
हे चिखलेवीण रोविती , । पाशिकेवीण [10] गोविती , ।
हे कवणाजोगे न होती । आंतौटेपणे [11] ।।259।।

1 करामत
2 मेलेल्या जनावाराचे आतील भाग
3 मांगीण
4 बळ
5 निग्रह
6 उपटली
7 स्वाधीन होत नाहीत
8 एका पंक्तीला
9 हस्तगत करतात
10 फासा
11 अंर्तमयी

धूमेनाऽऽव्रियते वन्हिर्यथाऽऽदर्शो मलेन च ।
यथोल्बेनाऽऽवृतो गर्भस्तथा तेनेदमावृतम् ।।38।।

धुराने अग्नि किंवा धुळीने आरसा ज्याप्रमाणे आच्छादिला असतो,अगर वारेने गर्भ जसा वेष्टिला असतो; त्याप्रमाणे त्याने हे सर्व गुरफटुन टाकले आहे.

जैसी चंदनाची मुळी ।गिवसोनि घेपे [12] , व्याळी [13] ।
नातरी , उल्बाची खोळी [14] । गर्भस्थासी ।।260।।
कां , प्रभावीण भानु , । धूमेवीण हुताशनु , ।
जैसा , दर्पण मळहीनु । कहीच नसे ।।261।।
तैसे , इहीवीण एकले । आम्ही ज्ञान नाही देखिले ।
जैसे , कोंडेनि पां गुंतले । बीज निपजे ।।262।।

12 कवटाळते 13 साप
14 गर्भाभोवतालची वार

आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा ।
कामरूपेण कौन्तेय दुष्पूरेणानलेन च ।।39।।

कधीहि तृप्ति न पावणारा अग्निच असून,ज्ञात्याचा जो हा कामरूपी नित्यवैरी त्याने हे कौन्तेया ! ज्ञान झाकून टाकिले आहे.

तैसें , ज्ञान तरी शुद्ध , ।परी , इही असे प्ररुध्द [1] ।
म्हणौनि , ते अगाध [2] । होऊनि ठेले ।।263।।
आधी याते जिणावे , । मग ,ते ज्ञान पावावे , ।
तंव , पराभवो न संभवे । रागद्वेषां ।।264।।
याते साधावयालागी , ।जे बळ आणिजे आंगी ।
ते , इंधने जैसी आगी ।सावावो [3] होय ।।265।।

1 झाकलेले
2 मिळण्यास कठीण
3 मदत करतात

इंद्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते ।
एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ।।40।।

इंद्रिये,मन आणि बुद्धि,ही याचे अधिष्ठान म्हणजे घर किंवा किल्ला म्हंटले आहे.यांच्या आश्रयाने ज्ञानाला गुंडाळून ठेवून मनुष्याला हा भुरळ पाडीत असतो.

तैसे,उपाय कीजती जे , जे , ।ते , तें , यासीचि होती विरजे [4] ।
म्हणौनि , हटियांतें [5] जिणिजें । इहीचि जगी ।। 266।।
ऐसियांही सांकडा बोला [6] , । एक उपायो आहे भला , ।
तो करिता जरी आंगवला [7] । तरी सांगेन तुज ।।267।।

4 मदत
5 हटयोगी
6 कठीण गोष्टीला
7 आत्मसात करणार असशील

तस्मात्त्वमिद्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ।
पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ।।41।।

म्हणून,इंद्रियांचे प्रथम संयमन करून हे भरतश्रेष्ठा ! ज्ञान म्हणजे अध्यात्म आणि विज्ञान म्हणजे विशिष्ट ज्ञान यांचा नाश करणाऱ्या याच पाप्याला तु ठार मारुन टाक.

यांचा पहिला कुरुठा [8] इंद्रिये , । एथूनि , प्रवृत्ति कर्माते विये , ।
आधी निर्दळूनि घाली तिये । सर्वथैव ।।268।।

8 घर

इंद्रियाणि पराण्याहुरिंद्रियेभ्यः परं मनः ।
मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ।।42।।

असे म्हणतात की, स्थुल बाह्य पदार्थांच्या मानाने ते पदार्थ जाणणारी इंद्रिये पर म्हणजे पलीकडची, इंद्रियांच्या पलीकडे मन, मनाच्याहि पलीकडे व्यवसायात्मक बुद्धि , आणि जो बुद्धिच्याहि पलीकडे तो आत्मा आहे.

मग मनाची धांव पारुषेल [1] । आणि बुद्धिची सोडवण होईल , । 1 बंद पडेल
इतुकेन थारा मोडेल । या पापियांचा ।। 269।।

एवं बुद्धेः परं बुद् ध्वा संस्तभ्याऽऽत्मानमात्मना ।
जहि शत्रुं महाबाहो कामरुपं दुरासदम् ।।43।।

याप्रमाणे बुद्धिच्या पलीकडल्याला ओळखून व आपणच आपल्याला आवरून, हे महाबाहो अर्जुना ! दुरासाध्य कामरूपी शत्रुला तूं मारून टाक.

हे अंतरीहून जरी फिटले , । तरी निभ्रांत जाण निवटले ।
जैसे रश्मीवीण , उरले , । मृगजळ नाही ।। 270।।
तैसे , रागद्वेष जरी निमाले , । तरी ब्रह्मीचे स्वराज्य आलें ।
मग , तो भोगी सुख आपुले । आपणचि ।।271।।
ते , गुरुशिष्याची गोठी ।' पदपिंडाची [2] ' गाठी । 2 परमात्मा व जीव यांचा
तेथ स्थिर राहोनि नुठी । कवणे काळी ।।272।।
ऐसे , सकळ सिद्धांचा रावो , ।देवी लक्ष्मीयेचा नाहो , ।
' राया ऐके ' देवदेवो । बोलता जाहला ।।273।।
आतां , पुनरपि तो अनंतु । आद्य एकी मातु ।
सांगैल ; तेथ पंडुसुतु ।प्रश्नु करील ।। 274।।
तया बोलाचा , हन , पाडु [3] । की रसवृत्तीचा निवाडु [4] । 3 सामर्थ्य 4 वेचकपणा
येणे श्रोतया होईल सुरवाडु [5] । श्रवणसुखाचा ।।275।। 5 रेलचेल
ज्ञानदेवो म्हणे निवृत्तीचा , । '' चांग उठावा करूनि उन्मेषाचा [6] । 6 ज्ञानाचा
मग संवादु श्रीहरिपार्थाचा । भोगावा बापा ।।276।।

इति श्रीमद्भगवद्गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्याया योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मयोगो नाम तृतीयो ऽ ध्यायः ।।3।।